# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 16 August 2024

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १६ ऑगस्ट २०२४ दुपारी १.०० वा.

****

भारतीय अंतराळ संशोधन संस्था – इसरोच्या लघु उपग्रह प्रक्षेपण वाहन एस एस एल व्ही वरुन, पृथ्वी निरीक्षण उपग्रह EOS-08 चं यशस्वी प्रक्षेपण झालं. श्रीहरीकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रातून हा उपग्रह अवकाशात झेपावला. पीएसएलव्ही च्या तुलनेत दहा मीटर छोट्या असलेल्या एसएसएलव्हीचं हे तिसरं आणि शेवटचं विकास उड्डाण होतं. या रॉकेटने EOS-08 उपग्रह अचूकपणे त्याच्या अभिप्रेत कक्षेत पोहोचवला. एसएसएलव्ही विकास प्रक्रिया आता अधिकृतपणे पूर्ण झाल्यामुळे हे यश भारताच्या अंतराळ क्षमतांमध्ये एक महत्त्वपूर्ण मैलाचा दगड आहे, असं इसरोचे अध्यक्ष एस. सोमनाथ यांनी म्हटलं आहे.

****

केंद्रीय निवडणूक आयोग आज दुपारी तीन वाजता विधानसभा निवडणुकांच्या कार्यक्रमाची घोषणा करणार आहे. निवडणूक आयोगाच्या पथकाने नुकताच जम्मू काश्मीर आणि हरियाणाचा दौरा केला होता. त्या पार्श्वभूमीवर जम्मू काश्मीर आणि हरियाणा विधानसभा निवडणुकांची घोषणा यावेळी होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभांचा कार्यकाळही पुढच्या काही महिन्यांत पूर्ण होत आहे.

****

माजी पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज देशभरात त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. नवी दिल्ली इथं सदैव अटल या वाजपेयी यांच्या समाधीस्थळाजवळ प्रार्थना सभा घेण्यात आली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय मंत्रिमंडळातल्या सदस्यांनी अटल बिहारी वाजपेयी यांना अभिवादन केलं.

मुंबईत बोरिवली इथं अटल स्मृती उद्यानातल्या वाजपेयी यांच्या पुतळ्याला आमदार सुनिल राणे यांनी पुष्पांजली अर्पण करुन अभिवादन केलं.

****

कोलकाता इथं प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरवरील लैंगिक अत्याचार आणि हत्येच्या निषेधार्थ इंडियन मेडिकल असोसिएशननं उद्या एक दिवसाचा देशव्यापी संप जाहीर केला आहे. या काळात अत्यावश्यक सेवा सुरु राहणार असून, बाह्य रुग्ण विभागांचं कामकाज मात्र बंद ठेवण्यात येणार आहे. या घटनेनंतर कोलकाता रुग्णालयात परवा रात्री झालेल्या तोडफोडीचाही संघटनेनं निषेध नोंदवला आहे. दरम्यान, या घटनेच्या निषेधार्थ भारतीय जनता पक्षाच्या महिला विभागाच्या वतीनं आज कोलकाता इथं मूक मेणबत्ती मोर्चा काढण्यात येणार आहे.

****

पालघर जिल्ह्यातल्या विक्रमगड तालुक्यातील महिलांनी तयार केलेल्या पर्यावरण पूरक बांबूच्या राख्या यंदा सीमेवर तैनात असलेल्या सैनिकांच्या हातावर झळकणार आहेत. विशेष म्हणजे या राख्यांमधून वृक्ष लागवड देखील होणार आहे. विक्रमगड तालुक्या मधल्या टेटवाली, वाकी, जांभा, विळशेत, नडगेपाडा, वाणीपाडा आणि गरदवाडी या सात गावातल्या जवळपास १५० महिला आणि पुरुषांनी मिळून यंदा ३५ हजार बांबूच्या राख्या तयार केल्या आहेत. त्यामध्ये अयोध्या, कलश, सुमन आणि वक्रतुंड या चार प्रकारच्या राख्यांचा समावेश आहे.

****

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेअंतर्गत राज्यभरातल्या भगिनींच्या बँक खात्यात पैसे जमा झाल्याबद्दल आनंद वाटत असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे, रक्षाबंधनापूर्वी भावाने बहिणीला दिलेला हा माहेरचा आहेर असल्याचं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे. लाडक्या बहिणींना दिलेली ही मदत त्यांच्या मुलांच्या शालेय साहित्यासाठी, कुटुंबीयांच्या औषधांसाठी, तसंच महिलांच्या सुरु असेलेला छोटा-मोठा व्यवसाय वाढवण्यासाठी महत्त्वाची ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

****

दरम्यान, सेव्ह मुंबई कार्यक्रमाचा लोकार्पण सोहळा आणि द ॲड्रेस सोसायटीच्या वतीनं अडीच एकर क्षेत्रफळावरील “मानव निर्मित जंगलाचे लोकार्पण” मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते काल करण्यात आलं. सर्वांच्या योगदानातून आपल्याला पर्यावरण पूरक महाराष्ट्र घडवण्याचा मानस मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

****

अमरावती जिल्ह्यातील बडनेरा मतदार संघाचे आमदार रवी राणा यांनी आजपासून नागरिक संवाद दौऱ्याला प्रारंभ केला. नागरिकांच्या समस्या आणि तक्रारी त्यांनी ऐकून त्यांचं निराकरण करण्याचा प्रयत्न रवी राणा यांनी केला.

****

नांदेड जिल्ह्यात प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत २ लाख ५४ हजार ३३ शेतकरी नुकसान भरपाईसाठी विमा कंपनीकडून पात्र ठरले आहेत. आतापर्यंत ११९ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले असून, २० ऑगस्टपर्यंत सर्व पात्र शेतकऱ्यांना लाभाची रक्कम मिळावी असं निर्देशित करण्यात आलं आहे. २० ऑगस्टनंतर शेतकऱ्यांनी विमा कंपनीच्या तालुकास्तरीय कार्यालयात चौकशी करावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भाऊसाहेब बऱ्हाटे यांनी केले आहे.

****

येत्या दोन दिवसांत कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून विदर्भात बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. या कालावधीत मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होईल, असा अंदाज आहे.

****